(24)

मध्यवर्ती संकल्पचित्र संघटनामार्फत
कालव्यावरील बांधकामाच्या संकल्पन व
संकल्पचित्र संदर्भातील तरतुदीतील
सुधारणा.

महाराष्ट्र शासन
पाटबंधारे विभाग
मंत्रालय, मुंबई ४०००३२.
दिनांक : ३१ जुलै, १९९७.
क्रमांक : सीडीओ १०९५/२०१९/[४९/९५]/मो.प्र.[प्र]

शुद्धीपत्रक

पहावे : शासन परिपत्रक क्र. सीडीए १०९५/२०१९/[४९/९५]/मो.प्र.[प्र],
दिनांक १० जून १९९७.

वर नमूद केलेल्या शासन परिपत्रकातील आदेश क्र. १[अ] ज्या बांधकामाची किंमत रु. ५० लक्ष ते १०० लक्ष इतक्या मर्यादेत आहे, परंतु कालव्याचा विसर्ग ३५ घ.मी. सेंकद पेक्षा जास्त आहे अशा कालव्यावरील विसर्ग बांधकामाचे [स्ट्रक्चरचे] संकल्पन व संकल्पचित्र मध्यवर्ती संकल्पचित्र संघटनेमार्फत करण्यात यावीत. असे नमूद केले आहे त्याऐवजी खालीलप्रमाणे सुधारणा करण्यात येत असून त्या अनुषंगाने उपरोक्त संबंधित आदेशावरील भाग क्र. १ [अ] आता खालीलप्रमाणे वाचावा.

१.०[अ] ज्या बांधकामाची किंमत रु. ५० लक्ष ते २५० लक्ष इतक्या मर्यादेत आहे परंतु कालव्याचा विसर्ग ३५ घ.मी./सेंकद पेक्षा जास्त आहे अशा कालव्यावरील बांधकामाचे [स्ट्रक्चरचे] संकल्पन व संकल्पचित्रे मध्यवर्ती संकल्पचित्र संघटनेमार्फत करण्यात यावीत.

[ भ. तु. रेडकर ]
शासनाचे उप सचिव

प्रत,
पाटबंधारे विभागातील सर्व मुख्य अभियंता
पाटबंधारे विभागातील सर्व अधीक्षक अभियंता
पाटबंधारे विभागातील सर्व तांत्रिक कार्यासने / सर्व उप अभियंता
मध्यवर्ती संकल्पचित्र संघटनेचे सर्व अधीक्षक अभियंता [५ जादा प्रतींसह]
मो.प्र.[प्र], संग्रहार्थ

२. अधीक्षक अभियंता यांना विनंती करण्यात येते की, उपरोक्त शुद्धीपत्रक त्यांनी त्यांच्या अधिपत्याखालील कार्यकारी अभियंता यांचे निदर्शनास आणावे.

एक प्रत सांधिक परिपत्रक फाईलमध्ये लावणे.

सौ. देहेरकर
२९७९७